**सं.फौ.ख.क्र.१४/२०२३**
**अजय वि. निलु**
**निशाणी क्र. ३३ वर पुढे सुरू**

**अर्जदारातर्फे सा. क्र. १ चा पुरवा शपथेवर सुरू**
**माझे नाव : अजय यशवंत मडके,**
**वय : ३२ वर्षे, धंदा : खासगी काम,**
**राहणार : नवीन गुजरखेडी, सावनेर, तालुका सावनेर, जिल्हा नागपूर**

**सतपासणी विधीज्ञ श्री ए.एम.बांदरे यांच्यामार्फत**

१. घटना दि ०७.१०.२०२१ पासून सुरू झाली. त्यावेळी मला माझ्या मोबाईलवर ४ मिस कॉल दिसले. त्यानंतर मी त्या नंबरवर कॉल केला. मला पुढील व्यक्ती प्रिया पाटील असल्याचे सांगिण्यात आले. ती व्यक्ती म्हणाली मला आईच्या प्लॉट मध्ये हिस्सा पाहिजे नाहीतर माझा मर्डर करेल. मी कशामुळे मर्डर करणार असे म्हटले असता तिने मला अश्लील भाषेत 'मादरचोद, बहेनचोद' अशी शिवीगाळ केली. तिने मला घरात गुंडे घेउन येउन मारेल असे धमकाविले. त्यामुळे मी तो फोन कट केला. त्यानंतर ही मला २ ते ४ कॉल आले होते. मी फोन उचलला नाही.

२. त्यानंतर संध्याकाळी प्रिया पाटील ही कुणाल मडकेला घेउन माझ्या घरी आली. तिने मागच्या दरवाज्यातून येउन मारहाण केली. मी मधे गेलो तर मला 'लवडया, मादरचोद' अशी शिवीगाळ केली. त्यानंतर माझ्या लहान भाउ संदेश याला देखील मारहाण करण्यात आली. त्यांनी प्लॉट पाहिजे नाहीतर घरात येउन मारू अशी धमकी देउन निघून गेले.

**सं.फौ.ख.क्र.१४/२०२३**

**अजय वि. निलु**

**निशाणी क्र. ३३ वर पुढे सुरू**

३. त्यानंतर दि ०८.१०.२०२१ रोजी मी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. त्यांच्या पुन्हा दि ०९.१०.२०२१ रोजी ते लोक आले व त्यांनी माझ्या आईला केस पकडून मारहाण केली. ते माझ्या नावे असलेल्या रजीस्ट्रींचे २ दस्त व पैसे बळजबरीने घेउन गेले. त्यानंतर मी त्यांना पकडण्यासाठी गेलो असता मला कपील पाटीलने पकडून ठेवले व त्यावेळी कुणाल मडकेने मारहाण केली. आजूबाजूचे लोक जमा झाल्यानंतर ते लोक तेथून निघून गेले.

४. त्याच दिवशी मी पोलीस ठाण्यात फिर्याद देण्यासाठी गेलो होता. मी पाहतो तर माझ्या आगोदर आरोपी पोलीस ठाण्यात हजर होते. त्यांनी माझ्याविरूध्द बलात्काराची खोटी फिर्याद दिली. मी देखील त्या दिवशी आरोपींविरूध्द फिर्याद दिली होती.

५. त्यानंतर तहसील कार्यालयात तारीख होती म्हणून मी व माझा भाउ तहसील कार्यालयात जात होतो, आरोपी माझ्या मागे आले. ते म्हणाले की त्यांच्या सपाट्यात सापडला तर सांगतो. पोलीसांनी कोणतीही कार्यवाही केली नाही म्हणून मी शेवटी न्यायालयात तक्रार दाखल केली आहे.

६. मी प्रस्तुत प्रकरणात पोलीसांना दिलेल्या फिर्यादची स्थळ प्रत दाखल केली आहे. आता मला दि १२.१०.२०२१ व १४.१०.२०२१ रोजी मी पोलीस

निरिक्षक व उप विभागीय पोलीस अधिकारी, सावनेर येथे दिलेल्या फिर्यादीची स्थळ प्रत दाखविण्यात आली. या त्याच आहेत. त्यातील मजकूर मुळ फिर्याद प्रमाणे आहे. त्यावर प्राप्त करून घेतल्याबाबत पोलीस ठाणेचा शिक्का व संबंधीत अधिकारीची स्वाक्षरी आहे. फिर्यादच्या स्थळ प्रतिला अनु.**नि.क्र.४२ व ४३** देण्यात आला.

**सर तपास संपूर्ण**

**उलट तपास गैरअर्जदार यांचे विधीज्ञ श्रीमती जे.एच.शेंडे यांच्यामार्फत**

७. मी दि ०८.१०.२०२१ व ०९.१०.२०२१ रोजी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली होती. त्या आधारे कोणता गुन्हा क्रमांक नोंद झाला हे मी सांगू शकत नाही. मी ही तक्रार माझ्या सोबत झालेल्या दि.०७.१०.२०२१ व ०९.१०.२०२१ रोजीच्या घटनेबद्दल दाखल केली आहेत. मी दि ०८.१०.२०२१ रोजी दाखल केलेल्या फिर्यादची प्रत प्रस्तुत प्रकरणात दाखल केली नाही, याचे कारण मी सांगू शकत नाही.

८. मी नि.क्र.४२ व ४३ फिर्याद दाखल करतेवेळी मला प्रिया पाटील यांचे ४ मिस कॉल आल्याचे, मी त्यांना कॉल केल्याचे व त्यावर माझे बोलणे झाल्याचे नमुद केले नाही. कारण त्या घटनेची मी दि ०८.१०.२०२१ रोजी वेगळी फिर्याद पोलीस ठाण्यात दिली होती.

९. दि ०९.१०.२०२१ रोजी आरोपींनी ज्या रजीस्ट्री नेल्या त्या दस्तांचे वर्णन मी माझ्या फिर्यादमध्ये केले नाही, कारण ते दस्त त्यावेळी आरोपी घेउन गेले होते. हे म्हणणे खरे नाही की, मी कथन केल्या प्रमाणे आरोपी माझ्या घरात आल्याचे व त्यांनी बळजबरीने दस्त नेल्याचे मी खोटे सांगत आहे.

१०. नि.क्र.४२ व ४३ मध्ये मला कपीलने धरून ठेवल्याचे व कृणालने मारहाण केल्याचे नमुद नाही, कारण घटना मी संक्षीप्तपणे नमुद केली. तसेच नि.क्र.४२ व ४३ मध्ये 'मी पोलीस ठाण्यात गेलो तेव्हा आरोपी माझ्या अगोदर हजर असल्याचे, त्यांनी माझ्याविरूध्द बलात्काराची फिर्याद दिल्याचे, तहसील कार्यालयात जातांना आरोपींनी सपाट्यात सापडला तर दाखवितो असे धमकाविल्याचे', देखील मी नमुद नाही, त्याचे कारण मी सांगू शकत नाही.

११. हे म्हणणे खरे नाही की, मीच कुणाल मडकेला मारहाण केल्यामुळे माझ्याविरूध्द भा.दं.सं. कमल ३२४ नुसार गुन्हा दाखल झाला होता. हे म्हणणे खरे नाही की, त्यानुसार माझ्याविरूध्द नि.फौ.प्र. क्र ३६१/२०२१ शासन वि. अजय प्रलंबीत आहे. त्या प्रकरणात मी जमानत घेतली आहे. साक्षीदार स्वताःहून सांगतो की ते खोटे प्रकरण आहे.

१२. या प्रकरणामध्ये फौ.प्र.सं कलम २०० नुसार पुरावा देतांना प्रिया

पाटील मला संपवून टाकीन असे म्हटल्याचे सांगितले होते परंतु ही बाब देखील मी नि.क्र.४२ व ४३ मध्ये नमुद केली नाही, कारण त्याबाबत मी दि ०८.१०.२०२१ रोजी दिलेल्या फिर्याद मध्ये नमुद केले होते.

१३. ज्या मोबाईल क्रमांक वरून मला मिस कॉल आले व ज्यावर मी फोन केला तो क्रमांक मी कुठेच नमुद केला नाही, कारण माझ्या कडून ते राहून गेले. प्रियाने मला प्लॉटमध्ये हिस्सा मागीतल्याची बाब नि.क्र.४२ व ४३ मध्ये नमुद नाही, कारण ती बाब मी दि ०८.१०.२०२१ रोजीच्या फिर्यादमध्ये लिहीली आहे.

१४. या प्रकरणामध्ये फौ.प्र.सं कलम २०० नुसार पुरावा देतांना प्रिया व कुणाल माझ्या घरी किती वाजता आले हे नमुद नाही, कारण माझ्याकडून राहून गेले.

१५. तो जबाब देतांना मी प्रियाने माझ्या आईचे केस ओढल्याचे नमुद केले होते, परंतु ही बाब माझ्या लेखी तक्रारमध्ये व आज दिलेल्या तक्रारमध्ये नमुद नाही, कारण माझ्याकडून ते राहून गेले. आरोपींनी माझ्या कडून जी रक्कम नेली त्या रक्केच्या नोटा, नोटांचे क्रमांक मी नमुद केले नाही, कारण ती रक्कम मी नुकतीच बॅकेतून आणीली होती. ती रक्कम मी बॅकेतून काढल्याबाबत कागदोपत्री पुरावा सादर केला नाही, कारण माझ्याकडून राहून गेले.

१६. मला आरोपी क्र ४ ने ज्या रॉड व सेंन्ट्रींगचा पट्टा मारला त्याचे वर्णन

मी केले नाही, कारण माझ्याकडून राहून गेले असावे. मला मारहाण झाल्यानंतर मी उपचार घेतले होते त्याबाबत वैद्यकीय प्रमाणपत्र मी पोलीस ठाण्यात सादर केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्याविरूध्द फिर्याद दिल्यामुळे तील शह देण्यासाठी मी खोटी फिर्याद व खोटी तक्रार दिली आहे.

१७. हे म्हणणे खरे नाही की, माझ्याकडे रू ४५,०००/– रक्कमच नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपींना माझ्या घरासमोर मारहाण केली होती. घटनेवेळी हजर असलेल्या एकाही साक्षीदार व्यक्तीचे नाव नमुद केले नाही, ते माझ्या कडून राहून गेले असावे. हे म्हणणे खरे नाही की, कोणतीही घटना घडली नसतांना मी खोटा पुरावा सादर केला. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी तक्रार दाखल केली व आज खोटी साक्ष देत आहे.

**उलट तपास संपूर्ण** **फेर तपास काही नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत

( स.र.भरड )

दिनांक २८/०८/२०२३ **प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, सावनेर**

निशाणी क्र. ३३ वर पुढे सुरू